**नि.फौ.ख.क्रं. ९३/२०१०** **निशाणी क्र. ०७ पुढे**

**शासन .वि. वासुदेव वानखेडे**

**उलटतपास : अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ यांच्या आरोपीतर्फे विधीज्ञ के.डब्लू.मगरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु :**

२. सन २००९ मध्ये आरोपीविरुद्ध मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. प्रस्तुतच्या तक्रारीपुर्वी मी आरोपीविरुद्ध एक ते दोन वेळा तक्रार दिली होती. मला प्रस्तुतच्या केसमध्ये तक्रार दिल्याची तारीख आठवत नाही. मी पोलीस स्टेशनला तक्रार देतांना माझी शेतजमिन क्र.५/२ च्या सातबारा, ८–अ व नकाशा दिला होता. १.४६ आर जमिन आरोपीने माझ्या हक्कात लिहून दिली होती ही बाब तक्रार देतांना मी सांगितली होती. मी १.४६ आर जमिनीचे विक्रीपत्राचे झेरॉक्स प्रत पोलीसांना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्या विरुद्ध त्यांची जमिन हडप केल्याची तक्रार पोलीस स्टेशनला दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरील तक्रारीमध्ये आरोपीचे असे म्हणणे होते की, मी त्याची जमिन सावकारीच्या व्यवहारातुन हडप केली आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या तक्रारीमध्ये असे सांगितले आहे की, सदरची जमीन ही आरोपी यांनी खापरे यांना विकली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने चिंचोली येथील जमीन खापरे यांना विकली. माझी शेतजमिन मौजा बाकलापूर येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वर नमूद केल्याप्रमाणे शेतजमिन माझ्या ताब्यात व नावावर होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरील शेतजमिन दोन वर्षापुर्वी पर्यंत माझ्या नावावर व ताब्यात होती. हे म्हणणे खरे आहे की, मी दोन वर्षापुर्वी वर नमूद शेतजमिन विकली. हे म्हणणे खरे आहे की, सदरील विक्रीच्या व्यवहारामध्ये माझे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझे विरुद्ध सावकारी कायद्यांतर्गत तक्रार दिल्यामुळे मी प्रस्तुतची खोटी तक्रार आरोपीविरुद्ध दिली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.03.11 17:04:35 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**दिनांक** : ११/०३/२०२६